# जिल्हा वार्षिक नियोजन बैठकीत ८५७ कोटी मंजूर

## निधीच्या कामांचे प्रस्ताव शासकीय यंत्रणांनी तात्काळ द्यावेत; पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ मध्ये सर्वसाधारण ७०२ कोटी, अनुचित जाती उपयोजना १५१ कोटी व आदिवासी उपयोजनासाठी ४ कोटी २८ लाख असे एकूण ८५७ कोटी २८ लाख निधी मंजूर आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत निविदा प्रक्रिया राबवून जास्तीत जास्त विकास कामांचे कार्यारंभ आदेश दिले गेले पाहिजेत, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री पाटील बोलत होते. यावेळी खासदार ओम प्रकाश राजे निंबाळकर, धैर्यशील मोहिते पाटील, प्रणिती शिंदे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले- तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, उपायुक्त नियोजन संजय कोलगणे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहायक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी व नियोजन समिती सदस्यांनी मंजूर निधी अंतर्गत विविध विकासात्मक कामाचे प्रस्ताव दिनांक १० ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रशासकीय यंत्रणांकडे सादर करावेत. महाराष्ट्र विधानसभा आचारसंहिता १५ ते २० सप्टेंबर २०२४ दरम्यान लागण्याची शक्यता आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी जास्तीत जास्त कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत त्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही अत्यंत गतीने करावी, असेही त्यांनी सूचित केले.




सोलापूर महापालिका अंतर्गत रमाई व प्रधानमंत्री आवास योजनेचे कामे त्वरित पूर्ण व्हावीत, रामवाडी येथील प्रस्तुती गृहासाठी वैद्यकीय स्टाफ मिळावा, अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय कार्यवाही बंद करावी, दुहेरी पाईपलाईनचे काम, शहरातील उड्डाणपुलाचे काम, वीज वितरण कंपनीने रोहित्र उपलब्ध करणे व शेती पंप अनुषंगिक कामे, भीमा नदीतून वाहून जाणारे पाणी अडवणे, उजनी धरण जवळपास शंभर टक्के भरलेले आहे खालील भागाला पाणी सोडणे, पी एम किसान योजनेचे पैसे जमा करणे, अतिवृष्टी व टंचाईचे अनुदान शेतकऱ्यांना देणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे भव्य स्मारक बांधकाम गतीने पूर्ण करण्याबाबत लक्ष देणे या व अन्य विकासात्मक मागण्या सदस्यांनी केल्या व त्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून द्यावा असे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### कमी वेळात विविध प्रश्नांचा झाला ऊहापोह

या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करताना पिकविमा, जिल्ह्यातील जलजीवनची कामे, राशनचा कमी होत असलेला पुरवठा, उजनी दुहेरी पाईपलाईन, नागरिकांचे आरोग्य, पंढरपूर येथील मराठा भवन, शहरातील ई रिक्षा परवाना, जिल्ह्यातील गायराने, अनगरचे अप्पर तहसील कार्यालय, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना होणारा विद्युत पुरवठा, सौरउर्जा आदींबाबत विस्ताराने चर्चा झाली. या आयोजित बैठकीत जिल्हा नियोजन भवनात खासदार ओमराजे निंबाळकर यांचा मात्र करारी आवाज चांगलाच घुमताना दिसून आला. त्यांच्या विविध प्रश्नांना चंद्रकांतदादांनी संयम ठेवून आणि अभ्यासपूर्ण उत्तरे दिली.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४- २५ अंतर्गत कृषी व संलग्न सेवा ५१ कोटी, ग्राम विकास ६१ कोटी, नागरी क्षेत्राचा विकास १२५ कोटी, पाटबंधारे व पुर नियंत्रण ६३ कोटी, ऊर्जा विकास ५६ कोटी ४० लाख, रस्ते विकास ७६ कोटी, सामान्य शिक्षण ४२ कोटी, आरोग्य क्षेत्र ६२.६५ कोटी, तीर्थक्षेत्र, पर्यटन, गड किल्ले ४३.७५ कोटी, महिला बाल विकास २०.८६ कोटी व्यायामशाळा व क्रीडांगण विकास ७ कोटी अशा महत्त्वाच्या क्षेत्रासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली असल्याची माहिती पालकमंत्री श्री पाटील यांनी दिली. तसेच केंद्र सरकारच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट सांगोला हे दोन आकांक्षीत तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी दहा कोटीचा निधी ठेवण्यात आलेला आहे. तसेच ज्या यंत्रणांनी अद्याप सन २०२३- २४ मधील मंजूर कामासाठी आवश्यक दायित्वाच्या निधीची मागणी केली नाही ती मागणी लवकरात लवकर करावी. तसेच प्रशासकीय मान्यतेसाठी आवश्यक कार्यवाही केलेली नाहीत त्यांनी ती तातडीने पूर्ण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी निर्देशित केले.

### सप्टेंबर २७, २८ ला विधानसभेची आचारसंहिता लागण्याचे संकेत

जिल्हा नियोजनाच्या या बैठकीत सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना गतवर्षीची विकासकामे आणि निधी ऑगस्ट एन्डपर्यंत पूर्णपणे खर्ची टाकण्याचे आवाहन करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता २७, २८ सप्टेंबर रोजी लागण्याची शक्यता व्यक्त केली. यामुळे १० सप्टेंपरपूर्वीच ही जिल्ह्यातील विकासकामे पूर्णपणे मार्गी लावण्याचे आवाहन सर्व अधिकाऱ्यांपुढे आहे.

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत रमाई घरकुल योजना व प्रधानमंत्री आवास योजनांची संबंधित अधिकाऱ्यांनी आतापर्यंत मंजुरी दिलेली प्रकरणे, प्रत्यक्ष पूर्ण झालेली घरकुलांची संख्या, अपूर्ण घरकुलांची संख्या व त्याची कारणे आदी बाबीची सविस्तर माहिती पुढील आठ दिवसात सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. महापालिकेने रमाई घरकुल योजनेअंतर्गत २७०० घरांची कामे पूर्ण केलेली आहेत परंतु अपूर्ण घरकुलांची संख्याही खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येत असल्याने महापालिकेने यामध्ये अत्यंत गतीने काम करून संबंधित लाभार्थ्यांची घरकुल पूर्ण करण्याची कारवाई केली पाहिजे, असे त्यांनी सूचित केले.

जिल्हा नियोजन समितीमध्ये खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खा. प्रणितीताई शिंदे, खा. धैर्यशील मोहिते पाटील, आ. सुभाष देशमुख, आ. संजयमामा निंबाळकर, माजी आ. प्रशांत परिचारक यांनी जिल्ह्यातील विविध विकासाचे महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आणि ही महत्वाची कामे केव्हा मार्गी लागतील, याबाबत अधिकारी आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून उत्तरेही घेतली. जिल्हा नियोजन समिती सदस्यांनी मात्र आक्रमक होत जिल्ह्यातील विविध प्रश्नी पालकमंत्र्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. मात्र पालकमंत्री दादांनी आपल्या शैलीत आणि संयम ठेवून सर्वांना समाधानकारक उत्तरे दिली.

### आ. विजय देशमुखांची पालकमंत्र्यांवर नाराजी

आरोग्य विभागाचा विषय सुरू असताना आ. विजयकुमार देशमुख यांनी शहरातील महिला व बालकांसाठी १०० खाटांचे वेगवेगळे हॉस्पिटल सुरू आहे पण तिथे डॉक्टर नाहीत आवश्यक कर्मचारी नाहीत. मग ते दवाखाने कसे चालणार? असा प्रश्न उपस्थित केला. इतकेच नाहीतर ८ वर्षांपासून शहरातील उड्डाणपुलांचा विषय सुरू आहे मात्र भूसंपादन प्रक्रिया पार पडत नाही? असा सवाल उपस्थित केला. यावेळी देशमुख म्हणाले, मी या विषयावर वारंवार बैठक घेऊन आढावा घेत असतो असे उत्तर देताच देशमुख चांगलेच चिडले. ते म्हणाले, दादा तुम्ही बैठकांना लोकप्रतिनिधींना बोलावत नाही, कसे चालणार मग, आम्ही प्रश्न कुठे मांडायचे? असे म्हणून आपली थेट नाराजी व्यक्त केली. याच बरोबर उड्डाणपुलांचाही विषय त्यांनी या बैठकीत लावून धरला. यावेळी दादांनी सावरून घेताना ती बैठक आमदार, खासदारांसाठी नसते, पण यापुढील आढावा बैठकांना आता सर्व आमदार-खासदारांना मी निमंत्रण देतो. असे सांगितले.

महापालिकेच्या दुहेरी पाईपलाईन तसेच उड्डाणपुलांच्या कामकाजाचाही पालकमंत्री पाटील यांनी आढावा घेऊन याबाबत स्वतंत्र बैठका घेऊन ही कामे मार्गी लावण्याची कारवाई करण्यात येईल असे सांगितले. वीज वितरण कंपनीने त्यांच्याकडील विविध कामाच्या अनुषंगाने पुढील आठवड्यात स्वतंत्र बैठक घेण्याची सूचना केली. अनगर येथे मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालयाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांची संबंधित सदस्य सोबत भेट घेऊ असे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेने त्यांच्याकडील विविध विकासात्मक कामाच्या मंजूर निधीतून आवश्यक कामे त्वरित प्रस्तावित करावीत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. कृषी सेवा केंद्रातून औषध घेऊन फवारणी केल्याने पिकांची नुकसान भरपाई पिकांचे नुकसान झालेले आहे अशा कृषी सेवा केंद्राची तपासणी करावी तसेच पिकांचा तपासणी अहवाल मागून घ्यावा असं संबंधित कृषी सेवा केंद्र सील करण्याचे निर्देश पालकमंत्री पाटील यांनी कृषी विभागाला दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील विषयाची माहिती सादर केली. जिल्हा परिषद योजना सन २०२३- २४ चा माहे मार्च २०२४ अखेर सर्वसाधारण योजना ५९० कोटी अनुसूचित जाती उपायोजना १५०.९८ कोटी आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ३.७७ कोटी असा एकूण मंजूर निधीच्या ७४५.२८ कोटीच्या अंतर्गत ७४४.७५ कोटी खर्च झाल्याची माहिती देऊन खर्चाची टक्केवारी ९९.९९ टक्के इतके असल्याचे त्यांनी सांगितले. पीएम किसान सन्मान योजनेचा सतरावा हप्ता जमा करण्यात आलेला असून जिल्ह्यातील ४ लाख ८५ हजर ५८५ शेतकऱ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यावर ९६ कोटी जमा करण्यात आलेले आहेत. तसेच आधार सीडिंग नसणे व अन्य कारणामुळे ज्या शेतकऱ्यांचे पैसे जमा झालेले नाही त्यांच्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

सोलापूर महापालिकेच्या रामवाडी येथील आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी पोस्टाच्या अनुपस्थिती बाबत माहिती घेऊन संबंधितावर कारवाई करण्यात येईल अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी दिली. तसेच सोलापूर शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी दुहेरी पाईपलाईनचे ११० किलोमीटर पैकी ९७ किलोमीटरचे पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले असून जॅकवेलचे ७३ टक्के काम पूर्ण झालेले आहे तर पंपाचे काम ही पूर्ण झाल्याचे माहिती श्रीमती उगले यांनी देऊन तीस नोव्हेंबर २०२४ पर्यंत दुहेरी पाईपलाईनचे काम पूर्ण होईल. तसेच शहरातील उड्डाण पुलाच्या कामाच्या अनुषंगाने भूसंपादनाच्या प्रक्रियेमुळे वेळ लागत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधी व अशासकीय सदस्यांनी पुढील प्रश्न, सूचना मांडल्या व विकासासाठी निधी देण्याची मागणी केली. प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी स्वागत केले. नियोजन समितीच्या बैठकीतील विविध विषयांची माहिती त्यांनी सादर केली.

## नव्या रिज्टा इलेक्ट्रिक स्कुटरचा उद्या अनावरण सोहळा

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

जगप्रसिद्ध अशा अथर एनर्जीने आणखी एक नवीन, तितकीचं खास आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी रिज्टा ही इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटर मार्केट मध्ये आणली असून, ही इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटर सध्या ग्राहकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे. सोलापूरकरांसाठी होटगी रोडवरील चव्हाण उद्योग समुहाच्या अथर या अद्ययावत शोरुममध्ये ही इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटर उपलब्ध झाली असून, सोमवार, दि. ५ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ६:०० वाजता या इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटरचा अनावरण सोहळा आयोजित केला आहे.

आत्तापर्यंत १८५ लोकांनी या इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटरची बुकिंग केली असून, या वर्षातील पहिला श्रावण सोमवार असल्यामुळे ६१ गाड्यांचे वितरण सोहळा देखील याच दिवशी आयोजित केला आहे. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर आरटीओ गजानन नेरपगारे हे या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत. अथर या जगप्रसिद्ध कंपनीच्या इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटर ही ग्राहकांच्या चांगल्याचं पसंतीस आणि विश्वासास पात्र ठरल्या असून, इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटर घेताना ग्राहकांचे प्राधान्य अथरच्या इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटरला असते. सोलापुरातील प्रसिद्ध अशा चव्हाण उद्योग समुहाच्या माध्यमातून होटगी रोडवर अथरचे अद्ययावत असं शोरुम उभारण्यात आले असून, या ठिकाणी अथरचे सर्व नवनवीन मॉडेल ग्राहकांसाठी नेहमीचं उपलब्ध असतात. विशेष म्हणजे एकाचं चार्जवर चक्क १५९ कि मी पर्यंतची रेंज प्राप्त होत असल्यानं दिवसभराचा वापर सहजपणे करणे शक्य आहे. ८० किलोमीटर प्रति तास, हा या इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटरचा टॉप स्पीड असून, या उच्च गतीमुळे ती शहरात तसेच बाहेरच्या मार्गांवर उत्तम राईडिंगचा अनुभव देते. साधारणतः ५ तास ४५ मिनिटे या जलद चार्जिंग क्षमतेमुळे स्कूटर लागलीचं फुल चार्जिंग होउन ग्राहकांना वापरण्यास उपलब्ध होते. स्कूटरचे फ्रंट डिस्क ब्रेक आहेत. उच्च गुणवत्ता असलेले हे ब्रेक्स वापरकर्त्यांना सुरक्षितता प्रदान करतात आणि नियंत्रित ब्रेकिंग सुनिश्चित करतात. सस्पेंशनचा विचार करता फ्रंटमध्ये टेलिस्कोपिक सस्पेंशन आणि रिअरमध्ये ट्विन शॉक सस्पेंशनची सुविधा देण्यात आल्यानं विविध प्रकारच्या रस्त्यांवर आरामदायक राईड मिळते. याचं बरोबर १२ इंच साइजचे व्हील्स हे देखील रिज्टाचे वेगळे वैशिष्ट्य आहे. मोठ्या साइजचे व्हील्स अधिक स्थिरता आणि उत्कृष्ट राइडिंगचा वेगळा अनुभव देतात. या स्कूटरची वहन क्षमता अर्थात लोड कॅपॅसिटी ही २५० किलोग्रॅम पर्यंत असून यामध्ये वापरकर्त्यांना लहान व मोठ्या वस्तू ठेवण्यासाठी एकूण ५६ लिटरची डिकी देखील देण्यात आली आहे. सदर स्कूटरचे बुकिंग चालू असून, याचा ग्राहकांनी आवश्य लाभ व या इलेक्ट्रिक फॅमिली स्कूटरच्या अनावरण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन बाबू चव्हाण आणि घनश्याम चव्हाण यांनी ग्राहकांना केले आहे.




## सोलापूरच्या जिल्हा नियोजन बैठकीत शिंदे-ठाकरे गट आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी झालेली जिल्हा नियोजन समितीची सभा चांगलीच आठवणीत राहणारे ठरले आहे. या सभेमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख आक्रमक पाहायला मिळाले. त्यामध्ये मनीष काळजे आणि चरणराज चवरे यांचा समावेश होता.

सभेमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर हे डायसवर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या बाजूला होते. ओमराजे हे वारंवार बोलत असल्याने खाली बसलेल्या सदस्यांना बराच वेळ बोलता येईना हे पाहून समोर बसलेले शिवसेना जिल्हाप्रमुख काळजे हे चांगलेच चिडले. जेव्हा मनीष काळजे यांनी सोलापूर महापालिकेच्या अंतर्गत रमाई आवास योजनेचा मुद्दा उपस्थित केला. गोरगरिबांना घरे पाडण्यास सांगितले जातात परंतु त्यानंतर बरेच महिने त्यांची घरे मंजुर होत नाहीत. हे महापालिकेचे अधिकारी जाणीवपूर्वक करतात असा मुद्दा उपस्थित करून महानगरपालिका आयुक्तांना चांगलेच धारेवर धरले. तेव्हा महापालिकेचे अधिकाऱ्यांना उत्तरे देता आली नाहीत यावर काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे आणि आमदार विजयकुमार देशमुख यांनी ही या मुद्द्यावर नाराजी व्यक्त केली. यानंतर पालकमंत्र्यांनी महापालिका प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. दरम्यान याच वेळेस धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर हे बोलत असताना मनीष काळजे यांना धारेवर धरण्याची संधी मिळाली. पुण्याची पुनरावृत्ती करू देऊ नका, खासदारांना डीपीडीसी मध्ये बोलण्याचा अधिकार नाही, असे अजितदादांनी सांगितले आहे. असा सूर या पदाधिकाऱ्यांनी लावून धरला.







## मधुकरराव चव्हाण लढविणार विधानसभेची निवडणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३ ऑगस्ट-**

विधानसभा निवडणुकीत सलग चारवेळा विजयी संपादन केला आहे. यावेळी २०२४ ची विधानसभा निवडणूक कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी लढवणार आहे, असे सांगत माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी विधानसभा आखाड्यात उतरणार असल्याचे संकेत दिले. अणदूर येथील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील अनेक गाव, खेड्यातील वाडी-वस्तीतील विकासात्मक कामे केली आहेत. तुळजापूर विधानसभा मतदारसंघ हे माझे कुटुंब आहे. वयाच्या नव्वदाव्या वर्षीही तोच जोश, तोच उत्साह व सतत जनतेच्या संपर्कात असतो. मी निवडणूक हरल्यानंतर कधीच नाराज होऊन घरी बसलो नाही. सतत लोकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मतदारसंघातील अनेक गावात मजुरांच्या हाताला काम मिळून दिले, असे त्यांनी सांगितले. गाव तेथे पाझर तलाव त्यांच्या काळात करण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी ओलिताखाली आल्या. अनेक विकासात्मक कामे केली आहेत. गाव तेथे सभागृह बांधले आहे. निराधारांना शासकीय योजनेतून आधार देण्याचे काम केले. गोरोबाकाका देवस्थानसाठी अडीच कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. तुळजापूर तालुक्याचा सर्वांगिण विकास करण्याचा आजपर्यंत प्रामाणिक प्रयत्न केला. पक्षाशी एक एकनिष्ठ राहिलो. अडचणीच्या काळात अनेकजण पक्ष सोडून गेले. पण मी मात्र जागेवर राहिलो. आज भारतीय जनता पक्षाच्या कारभाराला तालुक्यातील जनता वैतागली असून, लोकांना काँग्रेसचा विचार आता पटू लागला आहे. यावेळी मागील पराभवाचा वचपा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामपंचायत सदस्य ते मंत्रालय असा प्रवास मी केला. पंचायत समिती उपसभापती ते विधानसभा उपाध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे दोनवेळा अध्यक्षपद, असा माझा राजकीय प्रवास असल्याचे त्यांनी सांगितले.



### पक्षाकडे तिकिटाची मागणी

यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्यामुळेच माझ्यासारख्या ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. मी पक्षश्रेष्टीकडे तुळजापूर विधानसभा निवडणुकीसाठी तिकिटाची मागणी केली आहे. तालुक्याचा सर्वांगिण विकास करण्यासाठी मी शेवटची निवडणूक कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर लढविणार आहे असे शेवटी ते म्हणाले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)